Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA




Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi Part - III

Impact Factor / Indexing
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta
Prakashan

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - I Marathi Part - III January - March - 2019

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | समीक्षेचे स्वरूप<br>**डॉ. विठ्ठल केदारी** | १-४ |
| २ | दलित साहित्य समीक्षेची मूलतत्त्वे<br>**प्रा. डॉ. मारोती गायकवाड** | ५-९ |
| ३ | जागतिकीकरण आणि मराठी विज्ञानकथा<br>**डॉ. सचिन गंगाधर गिरी** | १०-१३ |
| ४ | स्त्रीवादाचे अलक्षित आयाम<br>**डॉ. योगिता आशुतोष पाटील** | १४-१७ |
| ५ | ग्रामीण जीवनानुभव संयतपणे साकारणार कथासंग्रह : 'कोंडी'<br>**डॉ. कल्याण गोपनर** | १८-२२ |
| ६ | कादंबरी समीक्षा : विशेष संदर्भ जगदीश कदम यांची 'गाडा' कादंबरी<br>**प्रा. गोरोबा रोडगे** | २३-२७ |
| ७ | ग्रामीण साहित्याच्या प्रेरणा<br>**प्रा. डॉ. शिवाजी नी. नागरे** | २८-३३ |
| ८ | स्त्रीवाद व स्त्रीवाद साहित्य समीक्षा<br>**प्रा. डॉ. संतोष जगन्नाथ जाधव** | ३४-३७ |
| ९ | स्त्रीवादी साहित्य समीक्षा<br>**काळे कल्पना व्यंकटराव** | ३८-४२ |
| १० | मार्क्सवादी साहित्य समीक्षा<br>**प्रा. प्रल्हाद दत्तराव भोपे** | ४३-४७ |
| ११ | 'नीरजा' यांच्या कथासाहित्याचे स्त्रीवादी दृष्टीकोनातून परिक्षण<br>**डॉ. वर्षा शिरीष फाटक** | ४८-५९ |
| १२ | गझल एक काव्यप्रकार आणि आजची गझल समीक्षा<br>**प्रविण रामकृष्ण मोरे** | ६०-६८ |
| १३ | विज्ञान साहित्याची मानसशास्त्रीय पध्दतीने समीक्षा<br>**प्रा. सौ. प्रिया मंदार नेरलेकर** | ६९-७५ |

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
**AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)**

# ६. कादंबरी समीक्षा : विशेष संदर्भ जगदीश कदम यांची 'गाडा' कादंबरी

**प्रा. गोरोबा रोडगे**
प्रमुख, मराठी विभाग, शिवनेरी महविद्यालय, शिरूर अनंतपाळ, जि. लातूर.

**प्रस्तावना**

साहित्य क्षेत्रामध्ये कोणत्याही कलाकृतीचे योग्य ते मूल्यमापन करण्यासाठी समीक्षा ही पद्धती अतिशय महत्त्वाची आहे. कादंबरी समीक्षा ही फार अवघड गोष्ट आहे असे अलीकडे वाटू लागले आहे. यासंदर्भात जितका विचार करतो तेवढे अधिकच वाटू लागते. म्हणजेच एका बैठकीत कादंबरी वाचून होत नाही. त्यामुळे स्मरणशक्तीला ताण न देता किंवा पुन्हा पुन्हा चाळताच ती मनात संपूर्ण धारण करणे किती कठीण आहे. कविता, कथा एका बैठकीत आपण वाचून टाकतो, परंतु कविता एका वाचनातही जवळ जवळ स्मरणात येते. कथा ही एका वाचनात स्मरणात ताजी राहते. नाटक सलगपणे आपण पाहतो. ते कादंबरीसारखे दीर्घ असले तरी आणि त्यात विश्रामस्थाने असल तरी अभिनय, नैपथ्य आणि आपण सामुहिक पातळीवर घरून उठून रंगमंदिरात जाऊन घेतलेला पवित्रा यामुळे त्याचीही संपूर्ण धारणा अवघड नसते.

कादंबरीसाठी मात्र आपण असा पवित्रा घेत नसतो. वाचतो वाचतो आणि ठेऊन देतो. कोणी मध्येच भेटावयास आले की त्याच्याशी बोलत बसतो. मुद्दाम रात्री-बेरात्री किंवा दारे खिडक्या बंद करून कादंबरीचे वाचन करणे हिताचे ठरत नाही. त्यातून एक आक्रमक पवित्रा जन्मास येतो. जो कादंबरीच्या आस्वादास मुद्दामच मारक ठरतो. म्हणून कादंबरीचे वाचन सहज अवस्थेत होणे आवश्यक असते. पूर्वनियोजित पवित्र्याने कादंबरी घटकाचे पृथक आकलन बारकाईने होऊ शकते, परंतु कलाकृती म्हणून तिचा आस्वाद त्यात शक्य नसतो. मनात तिची संपूर्ण धारण होऊन तिची समीक्षा शक्य नसते. सहज कादंबरी हाताला लागावी, सहज तिच्यात रंगून जावे, तिचे वाचन समग्र आणि सलग व्हावे, मनात तिची धारणा काठोकाठ व्हावी तेव्हा कुठे त्या कादंबरी संबंधिचा आपला उद्धार एका कलाकृतीवरील भाष्य आणि कादंबरीची समीक्षा या अर्थाने न्याय ठरू शकतो.

**कादंबरीची समीक्षा**

कादंबरीच्या अशा सहज सहज वाचनाने आपले मन इतके कादंबरीशरण झालेले असते की, तशा अवस्थेत तिचा घाट मनापुढे आणणे, तो मनात प्रत्यक्ष असूनही जड वाटते. कारण अशा अवस्थेत आपले मनच घाटाकार झालेले असते आणि हा घाट केव्हा संपन्न होईल. त्याच्या एकूण अंगोपांगाचा उच्चार अशक्याच्या आसपास त्यातील एखाद दुसऱ्या घटकालाच घाट संबोधून स्वत:ची फसवणूक करून घेण्याची शक्यता अतोनात असते. कादंबरीच्या समीक्षा संदर्भात डॉ. द. भि. कुलकर्णी म्हणतात की, 'कादंबरी, मग ती पण लक्षात कोण घेतो? असो वा अवलोकिता तिच्यात कथातत्त्व हेच असते. हे कथातत्त्व म्हणजे तिच्यातील विविध घटनांची कालतत्त्वानुसार असलेली माळ नव्हे कालतत्त्वात कुठलाही अनुभव बसविला

की आपोआप त्यातील विविध घटकांना घटनेचे व त्या एकूण अनुभवाला कथातत्त्वाचे पद प्राप्त होते. एका एका कादंबरीत हे घटनारुप कालतत्त्व, कथातत्त्व इतके समृद्ध असते की त्यातच कादंबरीची समग्रता, तिचा अंतिम घाट आपण गृहीत धरतो. यासंबंधी बोलणे यातच कादंबरी समीक्षेचे समाधान पाहतो.'[१] म्हणजेच कथाबंधाच्या आकलनावर कादंबरीची समीक्षा अवलंबून असते.

कादंबरीच्या समीक्षेसंदर्भात हरिश्चंद्र थोरात लिहितात की, 'कादंबरीची समीक्षा हा विषय कादंबरी या साहित्य प्रकाराशी संबंधित आहे. तेव्हा साहित्य प्रकार हे पहिले केंद्र ठरते. साहित्य प्रकाराच्या स्वरूपावरूनच समीक्षेचे स्वरूपही बऱ्याच मोठ्या प्रमाणात निर्धारित होते. साहित्य प्रकाराची विशिष्ट अवस्था, त्यामध्ये होत जाणारे बदल, त्याच्या आकलनाला प्राप्त होणारी नवनवी परीप्रेक्ष या सर्व गोष्टीच्या बाबतीत त्या साहित्य प्रकाराची समीक्षा संवेदनशील असणे आवश्यक असते. मराठी कादंबरीच्या समीक्षेने गेल्या शतकात कादंबरी या साहित्य प्रकाराचे स्वरूप समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. काय, केला असल्यास तो कसा आहे यासारख्या प्रश्नांची उत्तरे आपल्याला शोधावी लागतील.'[२] म्हणजेच समीक्षेतील तात्विक स्वरूपाच्या विचारव्यूहाचे एक अधिष्ठान कादंबरी समीक्षेला लाभलेले असते.

विसाव्या शतकातील समीक्षेचा व्यवहार हा संज्ञापनाचा व्यवहार असतो. हे संज्ञापन कोणाला तरी उद्देशून केलेले असते. समीक्षा ज्या वर्गाला आव्हान करत असते त्यावरून तिचे स्वरूप घडत असते. समीक्षेच्या भोवतालचे सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरण तिच्यावर परिणाम करीत असते. आपल्या परीने समीक्षा ही हे पर्यावरण घडविण्यात सहभागी होत असते. मराठी कादंबरीच्या बाबतीत अशा प्रकारचे वर्णन केलेले असते. विसाव्या शतकातील मराठी समीक्षा या ग्रंथामध्ये हरिश्चंद्र थोरात लिहितात की, 'समीक्षा हा एक ज्ञानव्यवहार असतो. तो अभ्यासपूर्वक करावा लागतो. त्यामुळेच ज्ञानव्यवहाराशी आणि अभ्यासाशी संबंधित संस्थात्मक साधन संचाचा आणि समीक्षेचा जवळचा संबंध निर्माण झालेला असतो.'[३] म्हणजेच आजच्या मराठी कादंबरीची समीक्षा महाविद्यालय आणि विद्यापीठामध्ये साहित्य शिकविण्याच्या उपक्रमाशी फार मोठ्या प्रमाणात संबंधित आहेत. या उपक्रमाच्या स्वरूपाचा आणि दर्जाचा अर्थच समीक्षेच्या स्वरूपाशी आणि दर्जाशी अनन्य संबंध असतो.

म्हणून मराठी कादंबरीच्या समीक्षेच्या संदर्भात या दृष्टिकोनातून शोध घेणे अतिशय महत्त्वाचे ठरलेले आहे. कादंबरी या नव्या साहित्य प्रकाराची जडण-घडण जशी मराठीमध्ये होत होती तशीच समीक्षा हा आणखी एक नवा संभाषित प्रकार मराठीमध्ये आकाराला येत होता. कादंबरी समीक्षेचा विचार, कादंबरीतील अदभूत वास्तव यांना स्पर्श करतोच. शिवाय कोणतीही कादंबरी चांगली म्हणून गणली जाण्यास तिचे सुभाषित काव्य व कथा या तिन्ही दृष्टिने श्रेष्ठ योग्यता असली पाहिजे असा कादंबरीचा निकषही समोर मांडतो. कादंबरीच्या समीक्षेसाठी तिची श्रेष्ठता, कनिष्ठता निश्चित करणारे वस्तुनिष्ठ निकष असण्याची गरज आहे. हिच भूमिका कादंबरी समीक्षकांनी आजपर्यंत घेतलेली आहे.

**जगदीश कदम यांच्या 'गाडा' या कादंबरीची समीक्षा**

जगदीश कदम यांच्या लेखनप्रवासाचा विचार करता त्यांच्या लेखनाची सुरुवात ही कथेपासून झालेली दिसते. स्वातंत्र्य मिळण्याच्या आसपास आणि १९६०-७० खेड्यापाड्यातून आलेल्या बहुसंख्य लेखकांनी आपल्या लेखनाची सुरुवात

कथेपासून केलेली आहे. कथेबरोबरच नामवंत लेखकांनी कादंबरी हा वाङ्मय प्रकाश यशस्वीपणे हाताळला आहे. जगदीश कदम यांच्या 'गाडा' या लघु कादंबरीची चर्चा करताना मराठी कादंबरीतील ही चर्चाही नजरेआड करता येणार नाही.

'गाडा' ही जगदीश कदम यांची लघुकादंबरी आहे की दीर्घकथा आहे या तांत्रिक तपशीलात पडण्यापेक्षा या कादंबरीच्या समकालीन, सामाजिक, सांस्कृतिक परीप्रेक्षात सामावून घेणे अधिक योग्य आणि सार्थ ठरणारे आहे. मराठी भाषेत ज्या ज्या वेळी असे लघुकादंबरीचे प्रयोग झाले त्या त्या वेळी दीर्घ कथा-लघू कादंबरी ही चर्चा झाली आहेच. 'बनगर वाडी' ही त्याला अपवाद ठरली नाही. जगदीश कदम यांची ही कादंबरी वाचताना या कादंबरीने वर्तमान वास्तवाचा जो परिघ समोर मांडला आहे आणि ज्या पद्धतीने मांडला आहे त्याचा विचार करता जगदीश कदम यांचे वर्तमानाकडे पाहण्याचे भान किती गंभीर आहे याचा प्रत्यय या कादंबरीतून येतो. जगदीश कदम यांच्या या 'गाडा' कादंबरीचा विचार करताना ग्रामीण कृषीजन संस्कृतीतील लेखकाची एक परंपरा निश्चितपणे समोर येते. ग्रामीण साहित्य या वर्गिकरणाखाली स्थूल मानाने आजवर बहुतेक समीक्षकांनी त्यांची मांडणी केली आहे. खेड्यापाड्यातल्या जगण्याविषयी, प्राणीमात्राविषयी, निसर्ग, मानवी वृत्ती, प्रवृत्ती याविषयी जे काही लिहिले जाते ते ग्रामीण साहित्य असे मांडणी करण्याची परंपरा विद्यापीठीय आणि महाविद्यालयीन समीक्षकांनी निर्माण केली आहे.

जगदीश कदम यांच्या कादंबरी लेखनासंदर्भात श्रीकांत देशमुख म्हणतात की, 'जगदीश कदम यांची 'गाडा' ही कादंबरी बहुजन नैतिकता आणि समकालीन गावगाडा आहेत. गावगाड्याचे चित्रण करताना लेखकाला खूप जबाबदारीने करावे लागते. केवळ सृष्ट दृष्ट पात्रांची मांडणी ढोबळमानाने करण्यातून गावगाडा उभा करता येत नाही. तर लेखकाला सर्वप्रथम हा गावगाडा केवळ एखाद्या गावापुरताच नाही तर एकूण ग्रामीण वास्तवाच्या पातळीवर समजून घ्यावा लागतो. चांगल्या लेखक, कलावंताचे समाजशास्त्रीय आकलन हे एकांगी आणि अपुरे असून भागत नाही. तसेच ते जातीविशिष्ट असूनही भागत नाही. गावगाड्याच्या निरपेक्ष आकलनातून केलेली कलात्मक मांडणी म्हणूनच जगदीश कदमांच्या 'गाडा' या कादंबरीचा निर्देष करता येईल.'[४] म्हणजेच गावात मराठा असला म्हणजे तो शोषकच असतो आणि दलित असला की तो शोषिकच असतो असे म्हणण्याची निदान आज तरी गरज नाही.

'गाडा' या कादंबरीमध्ये बाजीराव जसा आहे तसाच सतप्रवृत्तीचा दुल्बा आबाही आहे. कायम कष्ट करणारा सालगडी म्हणून राहणारा चिमीचा नवरा दत्तू पवारही आहे. दलित पोरासाठी होस्टेल काढून शासकीय योजनांचा दुरुपयोग घेणारे दलितही पोचीरामाच्या शिक्षण प्रवासात भेटतात. बौद्धवाड्यातला विठ्ठल हा पोचिरामाचा वर्गमित्र, परंतु त्याचा बदलता प्रवास आणि दलित असण्याचं राजकारण करीत गावात कलागती वाढविणे ही बाब आज सर्वांनाच प्रत्येक गावात राजरोस पाहायला मिळते. विठ्ठलासारखी एक मोठी पिढी आज गावोगावी तयार झाली आहे, याची नोंद सुद्धा जगदीश कदम यांनी 'गाडा' या कादंबरीमध्ये घेतली आहे. या आणि इतर घटकांचा विचार केला तर जगदीश कदमांचे समाजशास्त्रीय भान किती नेमके आहे याचे प्रत्यंतर या कादंबरीतून येते. या कादंबरीमध्ये जगदीश कदम लिहितात की, 'कादंबरीचा शेवट वाचताना सोनीचे विधान गावगाड्यातल्या एका जन्मतः सामंजस्य स्त्रीचे विधान वाटते. ती म्हणते जातीच्या टोळ्या करून कसा चालेल गाडा? जमलं

तर गाडा चांगला चालवा. हा गाडा चांगला चालावा म्हणून मायेचं वंगण घालावं पण उटी लावू नाही. पोचीन नाही लावली कव्हाच उटी. म्हणूनच त्याची वाट झाली सोपी.'[५] म्हणजेच ब्राह्मणाची बायको केली म्हणून नाराज असलेली सोनी सारखी माय आपल्या लेकाना अशा रितीने समजून घेते.

काबाडकष्ट करून आपल्या मुला-मुलींना शिकून मोठ केलेल अनेक बाया-माणसं आपल्याला स्वातंत्र्योत्तर गावगाड्यात भेटतात, सोनी हे त्याचे एक प्रातिनिधिक उदाहरण आहे. अर्थात शिकून मोठी आणि स्थिरस्थावर झालेली मुलं आपल्या मायबापाविषयी, गावातल्या लोकांविषयी, गावांविषयी कितपत बांधिलकी मानतात, ओलावा जपून ठेवतात हाही एक मोठा प्रश्न आहे. पोचीराम हा गावाबद्दल ओलावा जपून ठेवणाऱ्यांचा एक प्रतिनिधी आहे. त्याच्या मनात या व्यवस्थेविषयी, इथल्या मानसाविषयी द्वेष नाही तर डोळस जिव्हाळा आहे. शेती करणारा हा शेतीवर राबणाऱ्याचे शोषण कायमपणे करतो असे त्याला वाटत नाही. शेती हा व्यवसाय नफेखोरीसाठी नाही हे मी पुरता जाणून होतो, परंतु गावात आपल्या हक्काच राण आहे त्याला चिटकून बसणं मायला लाख मोलाच समाधान देऊ शकतं ही गोष्ट मला अधिक महत्त्वाची वाटत होती. हे पोचिचे विधान खेड्यापाड्यातून जन्मलेल्या, स्थिरावलेल्या पिढीविषयी खूप काही सांगून जाणारे आहे.

या रितीने शेतीव्यवस्था आणि तिथली माणसं समजून घेतल्याशिवाय आजचा गावागाडा कोणालाही समजून घेता येणार नाही, हिच बाब जगदीश कदम यांनी या निमित्ताने या कादंबरीत मांडली आहे. पोचिराम प्रथम डॉक्टर होणे, नंतर तो उपजिल्हाधिकारी होणे या बाबी त्याच्या माणूसपण उणे करत जाणाऱ्या न ठरता त्याला परिपक्व करणाऱ्या ठरतात. खरे म्हणजे महात्मा फुल्यांनी शेतकरी आणि शूद्राची मूले सत्तास्थानी आली तर शोषण संपेल अशी आशा बाळगली होती. आज राजकीय आणि प्रशासकीय सत्तास्थानाचा विचार करता महात्मा फुल्यांना अपेक्षीत असणारा बहुजन हा सत्तास्थानी असल्याचे चित्र दिसते. परंतु महात्मा फुल्यांना अपेक्षीत असणारा परिणाम मात्र झालेला दिसत नाही. अर्थशास्त्रीय परिभाषेतल्या जागतिकीकरणाची लाट आल्यानंतर हा बदल घडला आहे, असेही म्हणता येणार नाही.

जगदीश कदमांची 'गाडा' ही कादंबरी शंभरच्या आत बाहेर पृष्ठसंख्या असणारी कादंबरी आहे. अंधारातून उजेडाकडे येणाऱ्या वाटांना त्यांनी ही कादंबरी अर्पण केलेली आहे. यावरून जगदीश कदमांची बांधिलकी पुरेशी स्पष्ट होते. स्थूलमानाने या कादंबरीच्या कथानकाकडे पाहिले तर कुठलीही गुंतागुंत दिसत नाही. पोचीराम हा गावगाड्यात जन्मलेला एक सामान्य तरुण, त्याची शिक्षणासाठी होणारी ओढाताण, त्याचे पोरकेपण म्हणजे त्याला बाप नसणे, चिमी ही त्याची बहिण, सोना ही आई आणि गणा हा मामा यांच्या भोवती 'गाडा' ही कादंबरी फिरताना दिसते. हे कुटुंब मातंग समाजाचे आहे, काबाडकष्ट करून पोट भरणारे, कामय ओढाताण असणारे. पोचीराम प्राथमिक शिक्षण घेत असताना त्याला कायम प्रोत्साहन देणारे अडकिणे मास्तर चिमी आणि सोनाची जगण्याची कसरत चालू असताना पोचिराम कायम आपल्या शिक्षणाकडे लक्ष देत असतो. त्याचा एकूण प्रवास हा खूप समंजस असा वाटतो. आपण शिकत असताना समाजासाठी काहीतरी केले पाहिजे या धारणेतून शाळेत असतानाच त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांनी प्रेरीत होतात. डॉ. बाबासाहेबांचा पुतळा उभारण्याची त्याची धडपड, गावगाड्याच्या कक्षेत घडणाऱ्या अंधश्रद्धा, जुन्या प्रथा-परंपरा यांचा तो विरोध करतो. चिमीला

त्रास देणारा दगडू पाटलाचा बाजीराव हा या कथानकात एखाद्या खलनायकासारखा फिरताना दिसतो परंतु त्याचे अस्तित्व हे उपरे वाटत नाही. दलित स्त्रियांना त्रास देणे, तिचे शोषण करणे हे गावगाड्यातील वास्तव बाजीरावाच्या रुपाने जगदीश कदम यांनी खूप जबाबदारी सवंगपणा आणि भडकपणा टाळून मांडला आहे.


'गाडा' या कादंबरीमध्ये जगदीश कदमांनी आणखी एका महत्त्वाच्या बाजूला हात घातला आहे. स्थानिक आमदार बाबुराव पाटील आणि गणा मांग यांचे सुरुवातीच्या काळात असलेले संबंध, चोरीतून मिळणाऱ्या वाट्यातून वैर निर्माण होते. गणा हा नंतर निजामाविरुद्ध हैदराबाद संग्रामात उतरतो तो स्वयंस्फूर्तीने.

**समारोप**

जगदीश कदम यांनी 'गाडा' या कादंबरीमध्ये आत्मनिवेदनात्मक शैलीचा वापर केला आहे. चिमी, पोची, गणा हे स्वत:विषयी आणि एकमेकांविषयी बोलत जातात. नांदेड जिल्ह्यातील मराठवाडी बोलीतून ते आपली कहाणी सांगत जातात. साध्या सरळपणाने एखादी गोष्ट सांगावी तशी ही सारी पात्र बोलतात. त्यातून माणसं उभी राहतात. तो एक काळ उभा राहतो. गावातले ताणतणाव उभे राहतात आणि कादंबरी वाचून संपल्यानंतर वाटते की, या चौघांनी मिळून गावगाडाच आपल्या समोर उभा केला आहे. नुसता गावगाडाच नाही तर गावावर प्रभाव पाडणारे राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक नाटकही त्यांच्या आत्मगत निवेदनातून उभे राहतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याचे राजकारण जयभीमनगरचे नामांतर भवाणीनगर या रितीने जाती जातीत वाटला जाणारा गाव हे वाटणे भौतिक परिणाम करणारे नसते तर छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या दोन महामानवांच्या नावाने त्यांना अपेक्षीत नसणाऱ्या वैमनश्यात होणारे माणसाचे विभाजन हे सारेच क्लेशदायी प्रकार आज सर्वत्र घडताना दिसतात. जगदीश कदमांनी हे वर्तमान खुप संयमाने आणि वास्तवाचा खोल वेध घेऊन 'गाडा' या कादंबरीत मांडला आहे.

**संदर्भसूची**

१. कुलकर्णी द. भी., कादंबरी स्वरूप व समीक्षा, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००३, पृ. १२
२. थोरात हरिश्चंद्र, कादंबरीविषयी, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००८, पृ. २२०
३. खोले विलास (संपा.), विसाव्या शतकातील मराठी समीक्षा, प्रतिमा प्रकाशन, पुणे, २००४, पृ. १०१
४. पांचाळ संजीवकुमार, डॉ. जगदीश कदम व्यक्ती आणि वाङ्मय, समीक्षा प्रकाशन, नांदेड, २०१६, पृ. १७२
५. कदम जगदीश, गाडा, निर्मल प्रकाशन, नांदेड, २०१२, पृ. ३५




## CONTACT FOR SUBSCRIPTION

**AJANTA ISO 9001: 2008 QMS/ISBN/ISSN**

**Vinay S. Hatole**

**Jaisingpura, Near University Gate, Aurangabad (M.S) 431 004,**

**Cell : 9579260877, 9822620877 Ph: 0240 - 2400877**

**E-mail : ajanta1977@gmail.com Website : www.ajantaprakashan.com**